# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**मीरा रोड (जि.ठाणे) येथे म्हाडांच्या घरांची खरेदी विक्री सुरु असतांना म्हाडाचे अधिकारी याकडे दुर्लक्ष करत असल्याबाबत**

**(१) २४३ (२३-१२-२०१४). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मीरा रोड (जि.ठाणे) येथे म्हाडांच्या घरांची खरेदी विक्रीचा खुले आम बाजार सुरु करण्यात आला असतांना म्हाडाचे अधिकारी याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१४ मध्ये वा त्यासुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दलालांकडून नागरिकांची होत असलेली फसवणूक रोखण्याबाबत तसेच दलांलावर व म्हाडा अधिकारी यांचेवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०३-२०१६) :**(१) मीरा रोड येथे म्हाडाच्या घरांच्या खरेदी विक्रीसाठी माहे सप्टेंबर, २०१४ मध्ये Quikr या संकेतस्थळावर जाहिरात दिल्याचे कार्यालयांच्या निदर्शनास आले आहे. परंतु म्हाडा अधिकारी याकडे दुर्लक्ष करीत आहेत. हे खरे नाही.

(२) व (३) याबाबत मिळकत व्यवस्थापक, कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांनी दि.१३.१०.२०१४ अन्वये वरिष्ठ पोलीस निरीक्षक, काशिमिरा पोलीस स्टेशन, मीरा रोड, जि.ठाणे येथे IT Act अन्वये जाहिरातदाराची चौकशी करुन संबंधीतांवर योग्य ती कारवाई करणेबाबत तक्रार नोंदविलेली आहे.

---

**गोंदिया जिल्ह्यातील उपअधिक्षक भूमी अभिलेख कार्यालयातील लाचखोर भूमापकास अटक केल्याबाबत**

**(२) ४०७१ (१५-०१-२०१५). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्ह्यातील उपअधिक्षक भूमी अभिलेख कार्यालयातील भूमापक मनोज प्रभाकर रणदीवे यास लाच घेताना अटक झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०३-२०१६) :**(१) होय.

(२), (३) व (४) मनोज प्रभाकर रणदीवे, भूमापक उपअधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय अर्जुनी मोरगाव, जि.गोंदिया यांनी रुपये १,०००/- इतकी लाच मागणी करुन स्विकारल्या प्रकरणी त्याचेविरुध्द अर्जुनी मोरगाव पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. ३०२२/२०१४, लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ चे कलम ७, १३ (१) (ड) सह १३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात आरोपीस दि. २४.११.२०१४ रोजी अटक करण्यात आली असून मा.न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार त्यांची दि. २८.११.२०१४ रोजी जामीनावर सुटका झाली आहे. प्रस्तुत गुन्ह्याचा तपास पूर्ण झाला असून लोकसंवकांविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यास सक्षम प्राधिकार यांची मंजूरी घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**महाराष्ट्र गृहनिर्माण (नियमन आणि विकास) विधेयकात पुनर्विकास प्रकल्पांनाही स्थान मिळण्याबाबत**

**(३) ८९२४ (०७-०४-२०१५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र गृहनिर्माण (नियमन आणि विकास) विधेयकात पुनर्विकास प्रकल्पांनाही स्थान मिळणार आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सरकार “आदर्श करार मसुदा पध्दत” आणणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, “आदर्श करार मसुदा पध्दती”चे थोडक्यात काय स्वरूप आहे,

(४) तसेच मुंबईत सुमारे २५ लाख भाडेकरू राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, भाडेकरूंना गृहनिर्माण विधेयकांत  कशा पध्दतीचा फायदा होणार आहे,

(६) नसल्यास, शासन भाडेकरूंच्या फायद्याचे व उपयोगी विधेयक आणणार आहे काय ?

**श्री. प्रकाश महेता (०९-०३-२०१६) :**(१) महाराष्ट्र गृहनिर्माण (नियमन व विकास) अधिनियम, २०१२ च्या कलम ४ मध्ये यासदंर्भातील तरतूद आहे.
(२) व (३) महाराष्ट्र गृहनिर्माण (नियमन व विकास) (सर्वसाधारण) नियमांत आदर्श करार नमुना देण्यात आला आहे.
(४) व (५) व (६) महाराष्ट्र गृहनिर्माण (नियमन व विकास) अधिनियम, २०१२ मधील तरतूदी स्पष्ट आहेत. सद्यस्थितीत तो पूर्णपणे अंमलात आलेला नाही.

---

**दादर, मुंबई येथील लोकमान्यनगर पुनर्विकास प्रकल्पातील घोटाळ्याची चौकशी करण्याबाबत**

**(४) १३९३० (११-०८-२०१५). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दादर, मुंबई येथील लोकमान्यनगर पुनर्विकास प्रकल्पातील घोटाळ्याची चौकशी करण्याबाबत दिनांक ८ जानेवारी, २०१३ रोजी घर बचाओ-बनाओ आंदोलन या संघटनेनी तत्कालीन मा.मुख्यमंत्री यांना निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत गृहनिर्माण विभागाने पत्र क्रमांक संकीर्ण-२०१३/प्र.क्र.३५/दु व पु-१ दिनांक १४ फेब्रुवारी, २०१३ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण यांचेकडे कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त विषयी कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०४-०३-२०१६) :**(१) व (२) होय.
(३) व (४) दादर (प.) मुंबई येथील काकासाहेब गाडगीळ मार्गावरील लोकमान्य नगर प्रियदर्शनी सहकार पुर्नविकास प्रकल्पातील रहिवाश्यांची फसवणूक, गैरप्रकार व अनियमिततेच्या अनुषंगाने विकासकाचे ना हरकत प्रमाणपत्र रद्द करण्याची मागणी तक्रारकर्त्यांमार्फत करण्यात आलेली आहे. या व अशा प्रकारच्या तक्रारींच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयात दाखल याचिकांमध्ये न्यायालयांमार्फत भाडेकरुचे हित लक्षात घेऊन कार्यवाही करण्याबाबत देण्यात आलेल्या आदेशाचा विचार करता विकासकास देण्यात आलेले ना हरकत प्रमाणपत्र रद्द करण्याची तक्रारकर्त्यांची मागणी पुनर्वसनाचे काम लांबणीवर जाऊन रहिवाशांचे पुनर्वसन होण्यास विलंब होईल या कारणामुळे मान्य करणे शक्य नसल्याचा निर्णय म्हाडाच्या स्तरावर घेण्यात आलेला आहे.

---

**कुलाबा येथील संक्रमण शिबीराबाबत**

**(५) १५८७२ (२१-०१-२०१६). श्री.राज पुरोहित (कुलाबा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुलाबा येथील संक्रमण शिबीर येथे राहत असलेल्या रहिवाशांसाठी म्हाडामार्फत बांधण्यात

आलेल्या ७ मजली इमारतींसाठी सुरक्षतेच्या कारणांमुळे आर्मीने ७ मजल्यापर्यंत परवानगी नाकारली व ३ मजल्यापर्यंत राहण्याची परवानगी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतींमधील ४ ते ७ मजल्यावरील सुमारे ८० गाळे वापरविना असल्याचे निदर्शनास आले आहे तसेच शिबीरामध्ये ३५ वर्षे रहिवाशी राहत असून त्यांना अद्याप कायमस्वरुपी निवासी जागा देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ७ मजली इमारत बांधण्यास संबंधित विभागाने पुनर्वपरवानगी घेतली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व त्याचे स्वरुप काय काय ?

**श्री. प्रकाश महेता (१५-०३-२०१६) :**(१) होय, कफ परेड, कुलाबा येथिल ३० वर्षे जुन्या ६८८ संक्रमण गाळयांच्या पुनर्बांधणीचा निर्णय म्हाडा प्राधिकरणाने दि. २/११/२००५ घेतला होता व त्यानुसार प्रत्येकी १८०.०० चौ.फु. गाळे असलेल्या तळ + ७ मजल्यांच्या इमारती बांधण्याचा निर्णय घेण्यात आला होता. प्रथम टप्प्यात बांधकाम झालेल्या इमारत क्र. १-अ (तळ+ ७ मजले) व इमारत क्र. २-अ (तळ+६ मजले) चे बांधकाम पुर्ण झाले असून त्या इमारतीमधील तळ + ३ मजला इतक्या बांधकामास संरक्षण विभागाने (आर्मी) परवानगी दिलेली आहे व त्यानुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने भोगवटा प्रमाणपत्र दिलेले आहे.

(२) होय.

(३) सदर इमारतींच्या बांधकामास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने दि. २४-१२-२००८ व दि. १३-७-२०१२ रोजी मान्यता दिली होती. तथापि, इमारतींचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने संरक्षण विभागाकडून ना हरकत प्रमाणपत्र सादर करण्यास म्हाडाला कळविले . त्यानुसार सदर प्रकल्पालगतच्या नेव्ही आस्थापनेकडून दि. २३-१०-२०१२ रोजी ना-हरकत प्रमाण पत्र देण्यात आले असून संरक्षण विभागाने त्यांच्या दि. १८-५-२०११ च्या परिपत्रकाचा आधार घेऊन दि. १९-१-२०१३ च्या पत्रान्वये ना-हरकत प्रमाणपत्र देण्यास नकार दिला आहे.

(४) मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांच्या अहवालानुसार तत्कालिन मा. मुख्यमंत्री महोदयांनी त्यांच्या दि. १८-१०-२०१३ च्या पत्रान्वये मा. कैंद्रीय मंत्री, संरक्षण यांना या प्रकरणी लक्ष घालण्याबाबत केलेल्या विनंतीनुसार आर्मीने त्यांच्या पत्र दि. २३-८-२०१३ अन्वये तळ + ३ मजल्यांच्या इमारतीस ना हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे व संक्रमण गाळयांच्या इमारतीसाठी उर्वरित ४ मजल्यांकरिता व पुनर्वसित गाळ्यांच्या इमारतीसाठी उर्वरित ३ मजल्याच्या बांधकामांना ना हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी भारत सरकारच्या संरक्षण विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### मुंबईतील धारावी पुनर्विकास सुरु करण्यासाठी निविदा काढण्यात येणार असल्याबाबत

**(६) १६७४६ (११-०८-२०१५). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील धारावी पुनर्विकास सुरु करण्यासाठी निविदा काढण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धारावी क्षेत्र विमानतळाच्या परिसरात येत असल्याने उंचीवर मर्यादा आहेत, त्यामुळे इमारतीच्या उंची विषयी केंद्र सरकारकडून सवलतीसाठी पाठपूरावा करण्यात येणार असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास मा. मुख्यमंत्री यांनी आश्वासन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी केंद्र शासनाने मंजूरी दिला अाहे काय, धारावी पुनर्वसन प्रकल्प किती कालावधीत पूर्ण करण्याचे नियोजन आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०४-०३-२०१६) :**(१) व (२) मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि. ६.१.२०१५ रोजी झालेल्या बैठकीमध्ये धारावी पुनर्वसन प्रकल्पाच्या सेक्टर १ ते ४ च्या निविदेतील प्रारुप तरतुदीस मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार धारावी पुनर्वसन प्रकल्प यांचेकडून प्रकल्पातील सेक्टर १ ते ४ साठी जागतिक स्तरावर निविदा मागविण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली असून प्रत्येक सेक्टर साठी स्वतंत्र जाहिरात दि. ३०.१.२०१६ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. प्रश्नांकित बाबीविषयी प्रकल्पनिहाय आवश्यकता भासल्यास धारावी पुनर्वसन प्रकल्पाद्वारे संबंधित विकासकास सहकार्य करण्यात येणार आहे.

(३) धारावी पुनर्वसन प्रकल्पाकडून दि. ३०.०१.२०१६ अन्वये सुरु करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेला अपेक्षित प्रतिसाद मिळाल्यास धारावी क्षेत्राचा कालबध्द विकास ७ वर्षामध्य करण्याच नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील शासकीय निमशासकीय व खाजगी आस्थापनातील कर्मचाऱ्यांच्या घरांसाठी हौसिंग फंड उभारण्याचा प्रस्ताव

**(७) १८९३६ (१०-०८-२०१५). श्री.संजय कदम (दापोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय निमशासकीय किंवा खाजगी आस्थापनातील कर्मचारी घरांच्या किंमती आवाक्यात याव्यात यासाठी भविष्य निर्वाह निधीच्या धर्तीवर हौसिंग फंड उभारण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, उल्लेखित प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतला आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०४-०३-२०१६) :**(१) व (२) प्रस्तावित प्रारुप गृहनिर्माण धोरण व कृती आराखडा २०१५ च्या मसूद्यात म्हाडामार्फत अत्यल्प/अल्प/मध्यम उत्पन्न प्रवर्गाकरिता स्वयंसहाय्यित गृहनिर्माण निधी योजना, सुरु करण्याबाबत प्रस्तावित करण्यात आले आहे. अशा निधीत शासकीय, स्वयंरोजगार अथवा खाजगी व्यक्तीस उत्पन्नाच्या निश्चित रकमेचे मासिक अंशदान करणे अपेक्षित होते. अशा गृहनिर्माण निधीत १० वर्षे अंशदान केल्यानंतर शासनाच्या घरकुल योजनेत त्याचे अंशदान हे त्याच्या घराचा किंमतीचा भाग समजला जाऊन उर्वरित रक्कम कर्जरुपाने उभारु शकेल यामुळे घरासाठी बचत करण्यासाठी प्रोत्साहन मिळू शकेल असे अपेक्षित आहे.
(३) महाराष्ट्र राज्याचे प्रस्तावित प्रारुप गृहनिर्माण धोरण व कृती आराखडा २०१५ चा मसुदा राज्याच्या मा.आमदार/खासदार व प्रशासकीय विभागांना सूचना/शिफारशीकरिता पाठविण्यात आला असून प्राप्त सूचना /शिफारशी विचारात घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील अयोध्या नगर, इंदिरा नगर, वाशीनाका, आर.सी.मार्ग, चेंबूर येथे एसआरए योजना राबविण्याबाबत**

**(८) १९६३८ (२३-१२-२०१४). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील अयोध्या नगर, इंदिरा नगर, वाशीनाका, आर.सी.मार्ग, चेंबूर येथे एसआरए योजना राबविण्याबाबत या विषयावरील दिनांक ०९ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. गृहनिर्माण मंत्री यांना दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनाच्या संदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(३) अद्यापपर्यंत कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत आणि याप्रकरणी कार्यवाही केव्हा करण्यात येणार आहे ?

**श्री. प्रकाश महेता (०४-०३-२०१६) :**(१) होय.
सदरहू निवेदनामध्ये मा. लोकप्रतिनिधी यांनी अयोध्या नगर, इंदिरानगर, वाशीनाका, आर.सी.मार्ग. चेंबूर येथील एस.आर.ए. योजने संदर्भात संबंधित अधिकारी व कमिटीच्या सभासदांची संयुक्त बैठक मा.मंत्री , गृहनिर्माण यांचे दालनात आयोजिक करावी अशी विनंती केली आहे.

(२) व (३) सदरहू झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे विकासक बदलणेबाबत अयोध्या नगर सहकारी गृहनिर्माण संस्थेने दाखल केलेल्या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई यांचेकडे सुनावणी घेण्यात आली. सुनावणीअंती त्याबाबतचे आदेश दि. २.१.२०१३ रोजी पारित करुन विकासक मेसर्स, सृष्टीराज इंटरप्रायजेस (आय) लि. आणि वास्तुविशारद मे. मयुरी कंन्सलटन्टस यांची नियुक्ती रद्द करुन नवीन विकासकामार्फत योजना राबविण्यास परवानगी देण्यात आली. सदरहू निर्णयाविरुध्द विकासकाने उच्च स्तरिय समितीकडे अपील दाखल केले असून, सद्य:स्थितीत अपील उच्च स्तरीय समितीकडे प्रलंबित आहे.

---

**मुंबई शहरातील मोडकळीस आलेल्या हजारो उपकर प्राप्त इमारतींचा पुनर्विकास वेळेत करण्याबाबत**

**(९) १९६८८ (११-०८-२०१५). श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अर्जुन खोतकर (जालना), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील मोडकळीस आलेल्या हजारो उपकर प्राप्त इमारतींच्या पुनर्विकास वेळेत होत नसल्याने नव्या प्रस्तावित गृहनिर्माण धोरणात त्याला चालना देण्यासाठी काही उपाययोजना करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतला आहे, या प्रस्तावित गृहनिर्माण धोरणात कोणकोणत्या उपाययोजना केल्या आहेत व त्याची अंमलबजावणी केली आहे काय,

(३) असल्यास, या प्रस्तावावर अद्याप निर्णय घेतला, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व नव्या प्रस्तावित गृहनिर्माण धोरणाची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. प्रकाश महेता (१०-०३-२०१६) :**(१), (२)व (३) राज्याच प्रस्तावित प्रारुप गृहनिर्माण धोरण व कृती आराखडा २०१५ चा (मसुदा) तयार करण्यात आलेला असून, सदरील मसूद्याच्या प्रती राज्यातून प्रतिनिधीत्व करणारे मंत्री, राज्यातील संसद सदस्य, राज्य मंत्री मंडळातील मंत्री, विधानमंडळ सदस्य व प्रशासकीय विभागांना सूचना/शिफारशीकरिता पाठविण्यात आले. प्राप्त सूचना/शिफारशी विचारात घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**मुंबईकरांची घरांची निकड लक्षात घेऊन मुलांच्या लहानपणीच त्यांच्या नावे घर खरेदीबाबत**

**(१०) १९८५९ (११-०८-२०१५). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईकरांची घरांची निकड लक्षात घेऊन मुलांच्या लहानपणीच त्यांच्या नावे घर खरेदीसाठी

पालकांना तरतूद करता येईल अशी योजना शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यावर शासनाने निर्णय घेतला आहे काय, या योजनेचे स्वरूप काय आहे व यात कोणत्या अटी व निकष लावण्यात येणार आहे, उक्त योजना केव्हापासून कायान्वित करण्याचा शासनाचा मानस आहे,
(३) तसेच शासनामार्फत नविन गृहनिर्माण धोरण जाहिर करण्यात येणार आहे काय, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या धोरणातील प्रमुख वैशिष्ट्ये काय आहेत व त्यांची अंमलबजावणी कशाप्रकारे करण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०४-०३-२०१६) :**(१) नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रस्तावित प्रारुप महाराष्ट्र राज्याचे गृहनिर्माण धोरण व कृती आराखडा २०१५ चा मसूदा राज्याच्या आमदार/ खासदार व प्रशासकीय विभाग यांना सूचना/ शिफारशींकरीता पाठविण्यात आला असून प्राप्त सूचना/शिफारशी शासनाच्या विचाराधीन आहेत. गृहनिर्माण धोरण अद्याप अंतिम करण्यात आलेले नाही.

---

**मुंबई शहरात परवडणारी अधिकाधिक घरे निर्माण व झोपडपट्टी मुक्त करणेबाबत**

**(११) २३४०० (११-०८-२०१५). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), ॲड.वारीस पठाण (भायखळा), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) झोपडपट्टीमुक्त मुंबई व राज्य तसेच सर्वांसाठी घरे ही संकल्पना सन २०२२ पर्यंत राबविण्यासाठी शासनातर्फे गृहनिर्माण धोरणाचा आराखडा तयार करुन त्या अंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन योजनेला गती मिळण्यासाठी अनेक सुविधा देण्यात आल्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विकासकांना जादाचे चटई क्षेत्र देण्यापासून त्यांचेवर वेगवेगळ्या सोयींची खैरात केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, झोपडीधारकांसाठी तयार करण्यात येणारी घरे निम्न दर्जाची तसेच गुणवत्ता नसलेली असल्याच्या झोपडपट्टीधारकांकडून असंख्य तक्रारी केल्या जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी झोपडीधारकांना न्याय देण्यासाठी शासनाने कोणती कारवाई करण्यात आली वा प्रस्तावित आहे,
(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१०-०३-२०१६)** :(१) राज्याचे प्रस्तावित प्रारुप गृहनिर्माण धोरण व कृती आराखडा, २०१५ चा मसुद्यात सन २०२२ पर्यंत मुंबईसह आणि संपूण महाराष्ट्र झोपडीमुक्त करण्याच्या दृष्टीने मुलभूत सुविधा प्रस्तावित आहेत. सदर मसुदयाच्या अनुषंगाने मागविण्यात आलेल्या सूचना/शिफारशीच्य अनुषंगाने गृहनिर्माण धोरण अंतिम करण्याच्या दृष्टीने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. दरम्यान केंद्र शासनाने देखील "सर्वासाठी घरे २०२२" च्या संकल्पनेवर आधारित पंतप्रधान आवास योजना राबविण्याचे निश्चित केले असून महाराष्ट्र राज्याने दि. ९.१२.२०१५ च्या शासन निर्णयान्वये ही योजना काही सुधारणांसह राज्यात अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

(२) व (३) अशी वस्तुस्थिती नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईत सन २०१५-१६ आर्थिक वर्षात एस.आर.ए. अंतर्गत १२०० प्रस्तावापैकी ३२४ प्रकल्प पूर्ण झाले असल्याबाबत

**(१२) २५०७८ (११-०८-२०१५). ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत सन २०१५-१६ आर्थिक वर्षात एस.आर.ए. अंतर्गत १२०० प्रस्तावापैकी ३२४ प्रकल्प पूर्ण झाले असले तरी या योजनेअंतर्गत काम अत्यंत मंद गतीने सुरु असून योजनेला गती देण्यासाठी प्रोराटा, हाऊसिंग स्टॉक व प्रिमीयम बाबत निर्णय घेण्याचे शासन स्तरावर विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील प्रकरणी शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा प्रस्तावित आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०५-०३-२०१६)** :(१), (२) व (३) बृहन्मुंबई झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून मंजूरी दिलेल्या १२२४ झोपडपट्टी पुनर्वसन योजनांपैकी ४०५ योजना पूर्ण झालेल्या आहेत. बृहन्मुंबईमध्ये झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या संदर्भात विकास नियंत्रण नियमावली १९९१ विनियम ३३(१०) परिशिष्ट-IV कलम १.११ नुसार २५% प्रिमीयम घेण्याची तरतूद आहे.

---

## ठाणे, मीरा-भाईदर, वसई-विरार, कल्याण-डोंबिवली, इ. ठिकाणी स्मार्ट शहर केंद्र उभारण्याबाबत

**(१३) २६८९१ (१०-०८-२०१५). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्मार्ट शहर योजनेचा पाया आगामी गृहनिर्माण धोरणात घालण्याचे शासनाने ठरविले आहे, त्यानुसार मुंबई वगळता ठाणे, मीरा-भाईदर, वसई-विरार, कल्याण-डोंबिवली, इ. ठिकाणी स्मार्ट

शहर केंद्र योजनेला प्राधान्य देण्याचे प्रस्तावित केले असल्याची बाब माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या स्मार्ट शहर योजनेत सर्वसामान्यांना परवडतील अशी घरे उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०४-०३-२०१६)** :(१), (२) व (३) महाराष्ट्र राज्याचे प्रस्तावित प्रारुप गृहनिर्माण धोरण व कृती आराखडा, २०१५ च्या मसुद्यात मुंबईसह ठाणे, मीरा-भाईंदर, कल्याण-डोंबिवली, वसई-विरार महानगरपालिकांच्या स्मार्ट सिटी योजनेकरीता राखून ठेवण्याची व मुंबई महानगरपालिका सुध्दा स्मार्ट सिटी योजनेबाबत पुढाकार घेईल असे नमूद आहे. अशा शहरात स्मार्ट सिटी केंद्र प्रस्तावित करुन स्मार्ट सिटी योजनेची रुजवात केली जाईल असेही प्रस्तावित केले आहे. सदर मसुद्याची प्रत राज्यातील सर्व आमदार/खासदार तसेच प्रशासकीय विभागांना सूचना/शिफारशींकरीता पाठविण्यात आली असून प्राप्त सूचनांच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## सिंहस्थ कुंभमेळासाठी गंगापूर धरणातून बेकायदा पाणी सोडल्याबाबत

**(१४) २८५०५ (२१-०१-२०१६). श्री.अनिल कदम (निफाड), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्हयात दुष्काळ सदृष्य परिस्थिती असताना जिल्हाधिकारी, नाशिक यांनी सिंहस्थासाठी सोडलेले पाणी बेकायदेशीर असल्याचा निर्णय जनहीत याचीका नं. १५४ /२०१५ मध्ये दिनांक १४ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्या दरम्यान दिलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.न्यायालयाने आदेश दिलेले असतानाही शासनाच्या धोरणाच्या विरोधात पुन्हा दिनांक १८ सप्टेंबर, २०१५ रोजी पाणी सोडण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाचे धोरण व मा.न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन केल्याबाबत जिल्हाधिकारी, नाशिक यांच्यावर शासनाने कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०३-२०१६)** :(१) हे खरे नाही.
मा.उच्च न्यायालयाने दिनांक १४.०९.२०१५ रोजी अंतरीम आदेश पारीत करुन, दिनांक १८.०९.२०१५ व २५.०९.२०१५ च्या शाही स्नानासाठी पानी सोडण्यासंदर्भात पुन्हा आढावा घेण्याचे निर्देश दिले होते.
(२) मा.उच्च न्यायालयाचे आदेश विचारात घेऊन, दिनांक १९.०९.२०१५ च्या पर्वणी स्नानास ४३.३० दशलक्ष घनफुट पाणी धरणातून सोडण्यात आले आहे. कुंभमेळा शाही स्नानाकरीता शासन निर्णय दिनांक ०७.०९.२०१५ मधील तरतुदी विचारात घेऊन कार्यवाही करण्यात आली आहे.

(३) मा.उच्च न्यायालयाने जनहीत याचिका क्र. १५४/२०१५ मध्ये दिनांक १४.१०.२०१५ रोजीच्या आदेशान्वये, मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांना कुंभमेळ्यासाठी पाणी सोडण्याबाबत वैधता तपासून त्याबाबत अहवाल सादर करण्याबाबत निर्देशित केले होते. त्यानुसार मा.मुख्य सचिव, यांनी त्यांचेमार्फत अहवाल मा.उच्च न्यायालयास सादर केलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मे. नीलकमल लॉजिस्टिक या कंपनी व्यवस्थापनाने शेतक-यांच्या वारसांना नोकरीत सामावून न घेतल्याबाबत**

**(१५) २८७०९ (२१-०१-२०१६). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मे. नीलकमल लॉजिस्टिक, मु. टाकी-भोम, पो. मोठी जुई (ता. उरण, जि. रायगड) या कंपनीच्या व्यवस्थापकांसमवेत माहे मार्च, २०१५ मध्ये आगरी शिक्षण संस्था, खांदा कॉलनी, पनवेल येथे झालेल्या बैठकीत शेतक-यांच्या तीन वारसांना तसेच उरलेल्या एका वारसांस नोकरीत सामावून घेण्याचे आश्वासन देण्यात आले होते हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आश्वासनाची अद्यापही पूर्तता न केल्याने प्रकल्पग्रस्त कुटुंबियासमवेत दि. ३.८.२०१५ पासून आमरण उपोषणाचा इशारा कंपनी व्यवस्थापनाला दि.२४.७.२०१५ रोजी वा त्या सुमारास दिला हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, या शेतक-यांच्या वारसांना तातडीने कंपनीच्या सेवेत सामावून घेण्यासंदर्भात शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) असल्यास, या आश्वासनाची पूर्तता करण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१८-०३-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे. मे. नीलकमल लॉजिस्टीक कंपनी व्यवस्थापन व स्थानिक कामगार नेते यांच्यामध्ये माहे मे, २०१५ मध्ये झालेल्या बैठकीमध्ये दोन प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबातील सदस्यांना नोकरीत समावून घेण्याचे आश्वासन देण्यात आले होते.
(२) होय.
(३) वरिष्ठ पोलिस निरीक्षक, उरण यांच्याकडे दिनांक ४/०८/२०१५ रोजी झालेल्या बैठकीत ठरल्याप्रमाणे कंपनी व्यवस्थापनाने २ प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबातील वारसांना सेवेत सामावून घेतले आहे. तसेच या संदर्भात वरिष्ठस्तरावरुन चर्चा करुन निर्णय घेण्यासाठी विलंब झाल्याचे कंपनी व्यवस्थापनाने नमूद केले आहे.

---

**बुलडाणा जिल्हयातील नागरिक आधार कार्ड पासून वंचित असल्याबाबत**

**(१६) २८७६० (२१-०१-२०१६). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलडाणा जिल्हयातील सुमारे ५ लक्ष नागरिक आधार कार्ड पासून वंचित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आधार कार्ड निर्गमित करणा-या यंत्रणेकडे मोठ्या प्रमाणावर सुविधांचा अभाव आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आधार कार्ड न मिळालेल्या नागरिकांना ते त्वरीत उपलब्ध करून देण्यासाठी कोणत्या उपाय योजना करण्यात आली वा येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०३-२०१६) :**(१) बुलडाणा जिल्हयातील ३.०२ लाख नागरिकांची आधार नोंदणी शिल्लक आहे.
(२) व (३) सद्य:स्थितीत माहती तंत्रज्ञान संचालनालयाच्या ६५ आधार नोंदणी किटस बुलडाणा जिल्हयात उपलब्ध असून त्याशिवास नॉनस्टेट रजिस्ट्रारच्या १२ आधार नोंदणी किट्स उपलब्ध आहेत. याशिवाय जानेवारीच्या आखेरच्या आठवड्यात या जिल्हयाला अतिरिक्त ४० आधार नोंदणी किट्स उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. सदर किट्स सीएससी-एसपीव्ही या केंद्र शासनाच्या संस्थेअंतर्गत असलेल्या मे.सी.एम.एस. या संस्थेकडून कार्यान्वित आहेत. आधार नोंदणीची विशेष मोहिम कॅम्पनिहाय जिल्हयात अंगणवाडी तसेच शांळामध्ये देखिल राबविण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भूगाव (जि.वर्धा) येथील उत्तम गालवा मेटालिक कंपनीमधील १० कामगारांना पुर्वसुचना न देता ठेकेदाराकडून सेवेतून कमी केल्याबाबत**

**(१७) २८९१५ (२१-०१-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उत्तम गलवा मेटालिक कंपनी भूगाव जिल्हा वर्धा यांच्या स्टोर विभागातील ५ वर्षे जुन्या आणि नियमित काम करणाऱ्या तसेच पी. एफ आणि व्यवसाय कर भरणाऱ्या १० कामगारांना अचानक कोणतीही पुर्वसुचन न देता दिनांक १०/१०/२०१५ रोजी शिव इंडस्ट्रीज सर्विसेस या ठेकेदाराकडून कामावरून कमी करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नियमित २६ दिवस काम आणि ५ वर्षे सलग सेवा, पी.एफ, व्यवसाय कराची कपात आणि कंपनीतील निष्कलंक सेवा असे असतानाही कर्मचाऱ्यांना कामावरुन कमी करणाऱ्या ठेकेदार शिव इंडस्ट्रीज सर्विसेस यांचेवर आतापर्यंत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, बेकायदेशीरपणे अकुशल आणि नियमित काम करणाऱ्या कामगारांना कामावर सामावून घेण्याबाबत ठेकेदार आणि संबंधित कंपनी यांचेकडून नियमित समावेशन करण्यात येणार आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०८-०३-२०१६) :**(१) मुख्या मालक उत्तम गलवा मेटालिक कंपनी, भुगाव (जि.वर्धा) यांनी नियुक्त केलेल्या शिव इंडस्ट्रीज सर्विसेस या कंत्राटदाराने ७ कंत्राटी कामगारांना दिनांक १०.१०.२०१५ रोजी कामावरून कमी केले आहे. हे खरे आहे.

(२) ते (४) सरकारी कामगार अधिकारी, वर्धा, कार्यालयात सर्व संबंधितांना (मुख्य मालक, कंत्राटदार व कामावरून कमी केलेले कामगार) दिनांक ०६.११.२०१५ ते २२.१२.२०१५ या दरम्यान एकूण ५ वेळा चर्चेकरीता बोलविण्यात आले होते. तसेच अपर कामगार आयुक्त, नागपूर कार्यालयात दिनांक २३.१२.२०१५ ते दिनांक ०६.०२.२०१५ या दरम्यान सर्व संबंधितांच्या बैठका एकूण ५ वेळा आयोजित करण्यात आल्या होत्या चर्चेच्या  दरम्यान ७ जेष्ठ असलेल्या कामगारांना पुर्ववत कामावर घेण्याबाबत कंत्राटदारास सूचना करण्यात आली दिनांक १०.२.२०१६ रोजीच्या बैठकीत व्यवस्थापनाने सदर कामगारांना पुर्वतव कामावर घेणे शक्य होणार नाही असे सांगितले, उभय पक्षात तडजोड न झाल्याने कामगारांना पुढील कायदेशीर मार्गाचा सल्ला दिला ज्यामध्ये कंत्राटी कामगारांना औद्यकीय विवाद अधिनियम लागू असल्यामुळे प्रकरण कामगार न्यायायाल दाखल करावे अथवा औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ चे कलम २ के अंतर्गत प्रकरण कामगार आयुक्त कार्यालय, नागपूर येथे दाखल करावे असा सल्ला देवून प्रकरण बंद करण्यात आले आहे.

---

**कळे (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) येथे महिलेवर झालेल्या हल्ल्याबाबत**

**(१८) २९०८५ (२१-०१-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळे (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) येथे एका महिलेवर अज्ञात व्यक्तीने चाकूने हल्ला करून पोबारा केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी पोलिसांनी कारवाई करण्यास टाळाटाळ केल्यामुळे गावातील महिलांनी चार तास रस्ता रोको केला होता,  हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने संबंधित पोलीस अधिकाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे?

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०३-२०१६) :**(१) कळे, ता.पन्हाळा जि.कोल्हापूर येथे एका महिलेवर अज्ञात व्यक्तीने चाकुने हल्ला करुन पोबारा केल्याची घटना घडली नाही. परंतु दि.२४.८.२०१५ रोजी कळे ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर येथे फिर्यादी महिला जनावरांचे शेडमध्ये गाईचे दूध काढून गोठ्यामध्ये मांजरांना दुध घालत असताना पाठीमागून अज्ञात इसमाने येऊन त्यांच्या कानफाडात मारले त्यावेळी झालेल्या झटापटीत फिर्यादी महिला जखमी झाली व त्यांचा आवाज ऐकूण लोक येत असल्याचे चाहूल झाल्याने अज्ञात इसम पळून गेल्याबाबत दिलेल्या फिर्यादीवरुन कळे पोलीस ठाणे, भाग५, गुरनं.०९/२०१५, भा.द.वि. स. कलम ३२४, ३२३ प्रमाणे अज्ञात इसमाविरुध्द दि.२४.८.२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) कळे पोलीस ठाणेच्या हद्दीत एका महिलेवर अज्ञात व्यक्तीने चाकुने हल्ला करुन पोबारा केल्याची घटना घडली नाही. तसेच घटनेच्या अनुषंगाने गावातील महिलांनी रस्ता रोको केला नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**दोंडाईचा (ता.शिंदखेडा, जि.धुळे) येथे न्यायालयाची इमारत बांधण्याबाबत**

**(१९) २९१३८ (२१-०१-२०१६). श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दोंडाईचा (ता.शिंदखेडा, जि.धुळे) येथे गेल्या १० वर्षापासून सुरु असणारे न्यायालय हे नगरपालिकेच्या मालकीच्या इमारतीत सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, न्यायालयाच्या इमारत बांधकामासाठी पालिकेने स्वतंत्र पाच एकर जागा आरक्षीत केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त जागेवर न्यायालयाची इमारत बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०२-२०१६) :**(१) होय. सदरचे न्यायालय सन २००३ पासून भाडे तत्वावर नगर पालिकेच्या इमारती सुरु आहे.

(२) होय. दोंडाईचा येथील जुन्या कॉटेज हॉस्पिटलची जुनी इमारत न्यायालय व न्यायीक अधिकारी यांचे निवासस्थानासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तथापि, सदरच्या जुन्या व जीर्ण इमारतीत नवीन न्यायायल व निवासस्थान बांधण्याबाबतचा प्रस्ताव मा.मुंबई उच्च न्यायालयामार्फत शासनास सादर करण्यात आलेले होता.

(३) १४ व्या वित्ता आयोगाच्या शिफारशीच्या अनुषंगाने दोंडाईचा येथील नवीन न्यायालयीन इमारत बांधण्याबाबतचा प्रस्ताव सद्य:स्थितीत पुढे ढकलण्यात यावा. असे मा.उच्च न्यायालयास दि.४ जुलै, २०१५ च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. तथापि सदर ठिकाणी न्यायालयीन इमारत बांधण्याबाबत लोकप्रतिनिधींकडून वारंवार मागणी करण्यात येत असल्याने, दोंडाईचा येथील नवीन न्यायालय इमारतीचे बांधकाम अत्यंत निकडीचे व आवश्यक असल्यास, त्याबाबतचा अद्ययावत दरसूचीवर आधारित प्रस्ताव शासनास पाठविण्याबाबत मा.उच्च न्यायालयास दि. २९ जानेवारी, २०१६ च्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

(४) मा.उच्च न्यायालयाकडून सुधारित प्रस्ताव अद्यापपर्यंत शासनास प्राप्त झालेला नाही. सबब विलंबाबाबत प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वाडा (जि.ठाणे) तालुक्यात हरापुर येथे टॉप एस्पोर्ट, कंपनी बंद झाल्याने कामगारांवर उपासमारीची वेळ आल्याबाबत**

**(२०) २९२९५ (२१-०१-२०१६). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा तालुक्यातील हरापुर येथे टॉप एस्पोर्ट, सेवा मेडिकल आणि टॉप लाईटस या तीन नावाने चालणाऱ्या कंपनीने दिनांक १५ डिसेंबर, १९९८ रोजी कोणतीही नोटीस न देता कंपनी बंद केली व सर्व मशिनही मीरारोडच्या युनिटमध्ये आणल्या व व्यवसाय सुरु केल्याने ३५० कामगारांवर उपासमारीची वेळ आणली असल्याचे माहे ऑगस्ट २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामगारांना हक्काची देणी, भविष्य निर्वाह निधी मिळवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कार्यवाही केली नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१४-०३-२०१६) :**(१) वाडा तालुक्यातील हरापूर येथील मे. टॉप एक्सपोर्ट प्रा. लि. या कंपनीतील उत्पादन प्रक्रिया माहे ऑगस्ट, १९९८ वा त्या दरम्यान बंद झाली आहे, हे खरे आहे

दैनिक पुढारीमध्ये माहे ऑगस्ट २०१५ मध्ये प्रसिध्द झालेल्या बातमीवरुन ही बाब निदर्शनास आली आहे.

(२) कामगारांची कायदेशिर देणी मिळावीत म्हणून कामगारांनी अथवा कोणत्याही संघटनेने क्षेत्रिय कामगार कार्यालयाकडे तक्रार दाखल केली नसल्याने कार्यालयातील उपलब्ध अभिलेखावरुन दिसून येते. तथापि, श्रमिक जनरल कामगार यनियन या संघटनेने कामगारांचे वेतन अदा न करणे, उत्पादन प्रक्रिया थांबवणे व बेकायदेशिर टाळेबंदी घोषित करावी या बाबत मा. औद्योगिक न्यायालय ठाणे येथे युएलपी क्र २००/२०१० दाखल केलेली असून सध्या ती न्यायप्रविष्ठ आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे (जि.सिंधुदूर्ग) येथील सुजाता रिर्सेस कंपनीत सुमारे १० ते ११ वर्षापासून कार्यरत असलेल्या १६ स्थानिक कामगारांना सेवेतून काढलेबाबत**

**(२१) २९५९३ (२१-०१-२०१६). श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे (जि.सिंधुदूर्ग) येथील सुजाता रिर्सेस कंपनीत सुमारे १० ते ११ वर्षापासून कार्यरत असलेल्या १६ स्थानिक कामगारांना दिनांक ४ ऑगस्ट, २०१५ पासून काढून टाकण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार उक्त कंपनीतील अन्यायग्रस्त कर्मचा-यांना कामावर पुन्हा रुजू करुन घेण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०८-०३-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) होय. चौकशी केली आहे.

(३) सदर प्रकरणी सरकारी कामगार अधिकारी, सिंधुदुर्ग यांनी उभयपक्षामध्ये तडजोड घडवून आणण्यासाठी दि. ११/०८/२०१५, १७/०८/२०१५, २५/०८/२०१५ रोजी बैठका आयोजित करुन प्रयत्न केले. त्यानुसार उभयपक्षी बैठक दि. २५.८.२०१५ रोजी व्यवस्थानाच्या ठिकाणी घेऊन त्यामध्ये उभयपक्षी यशस्वी तडजोड घडवून आणली व व्यवस्थापनाने १६ कामगारांना पूर्ववत कामगार घेण्याचे मान्य केले. परंतू सद्यस्थितीत चौकशी केली असता, आतरराष्ट्रीय बाजारपेठेत लोहखनिजाचे बाजारभाव घसरल्याने, परिस्थितीची भविष्यातही सुधारणा होण्याची शक्यता संपूष्टात आल्याचे कारण देऊन पुन्हा संबंधित १६ कामगारांना दि. ३१/१०/२०१५ रोजी कायदेशीर देणी देऊन कमी करण्यात आले. कामगारांनी सदरहू रक्कमा स्विकारल्या असून त्यांची कोणतीही हरकत वा तक्रार नाही असे कंपनी व्यवस्थापनाने कळविलेले आहे.

(४) नव्याने संबंधित प्रकरणी स्थानिक कार्यालयाकडे कोणतीही तक्रार प्राप्त नाही.

---

**माणगांव, (जि.रायगड) येथील वरिष्ठ अधिकाऱ्याकडून महिला कर्मचा-याचा विनयभंग करण्यात आल्याबाबत**

**(२२) २९६१७ (२१-०१-२०१६). श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माणगांव, (जि.रायगड) तालुक्यातील विळे-भागाड एमआयडीसी मध्ये असलेल्या एका कंपनीमधील वरिष्ठ अधिकाऱ्याकडून त्याच कार्यालयातील महिला कर्मचाऱ्याचा विनयभंग केल्याबाबतची तक्रार माणगांव पोलीस ठाण्यात करून गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित अधिकाऱ्याविरूध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०३-२०१६) :**(१) होय,

(२) सदर घटनेबाबत माणगांव पोलीस ठाणे कॉ.गु.र.नं.११५/२०१५ भादंविसं कलम ३५४ (ड), ५०९ हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील आरोपीस अटक करण्यात आलेली आहे. आरोपीवर मा.न्यायालयात दोषारोपपत्र पाठविण्यात आले असून, प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिपळून येथे अनेक जण विनापरवाना सावकारी करणा-यांच्या पाशात अडकल्याबाबत**

**(२३) २९६४९ (२१-०१-२०१६). श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) येथे अनेक जण विनापरवाना सावकारी करणा-यांच्या पाशात अडकले असून कर्जदारांना धमकावण्याचेही प्रकार मोठ्या प्रमाणात सुरु असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कर्जदारांना विनापरवाना सावकारी जाचातून सोडविण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०३-२०१६) :**(१) सदर प्रकरणी चिपळूण तालुक्यातील चिपळूण, अलोरे, सावर्डे या पोलीस ठाण्यात कोणत्याही प्रकारचा गुन्हा दाखल नसून कोणत्याही कर्जदार यांनी पोलीस ठाण्यात तसेच संबंधीत बीट अधिकारी, कर्मचारी यांचेकडे लेखी किंवा तोंडी तक्रार केलेली नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील बीडीडी चाळींचा पुनर्विकासाबाबत**

**(२४) २९८६७ (२१-०१-२०१६). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या मुंबईतील बीडीडी चाळींचा पुनर्विकास करण्यास शासनाने प्राधान्य दिले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यासुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी तीन महिन्यांत कृती आरखडा तयार करण्यात येणार असल्याचे मा.गृहनिर्माण मंत्री यांनी सांगितले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील आराखडयात कोणत्या तरतुदीं करण्यात आल्या आहेत याचे शासन विवरण करील काय,

(४) नसल्यास, त्याची विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०४-०३-२०१६) :**(१), (२) व (३) बी.डी.डी. चाळीचा पुनर्विकास करण्यासाठी शासनाकडून कार्यवाही करण्यात येत असून त्या अनुषंगाने सल्लागार वास्तुशास्त्रज्ञाची नियुक्ती करण्याची कार्यवाही म्हाडा स्तरावर सुरु आहे. सदर चाळींच्या पुनर्विकासांच्या सर्व संबंधित मुद्द्यांबाबत शासन स्तरावरुन उचित कार्यवाही चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाटण (जि.सातारा) येथील पोलीस उपअधिक्षकांचे पद भरणेबाबत**

**(२५) ३०२६५ (२१-०१-२०१६). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाटण (जि.सातारा) येथे पोलीस उपअधिक्षकांच्या कार्यालयाची उभारणी करुन अनेक वर्षाचा कालावधी होऊनही अद्याप सदर कार्यालयाचा कारभार प्रभारी अधिकाऱ्यांमार्फत चालत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पाटण येथील पोलीस उपअधिक्षकांचे पद भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०३-२०१६) :**(१) हे खरे नाही.
श्रीमती नीता अशोक पाडवी, परिविक्षाधीन पोलीस उप अधीक्षक यांची उपविभागीय पोलीस अधिकारी, पाटण उपविभाग, जि.सातारा या पदावर नियुक्ती करण्यात आली असून, त्या सदर पदावर दि.२३.७.२०१५ पासून कार्यरत आहेत.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धामणी (ता. संगमेश्वरजि. रत्नागिरी ) येथे सुवर्णकाराचे दागिने व रोकड असलेली बॅग चोरट्याने आरामबस मधून पळविल्याबाबत**

**(२६) ३०७५६ (२१-०१-२०१६). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धामणी (ता. संगमेश्वरजि. रत्नागिरी) येथे दिनांक २२ ऑगस्ट, २०१५ रोजी मुंबईच्या दादर परिसरातील एका सुवर्णकाराचे सुमारे २७ लाखाचे दागिने व २ लाख रुपयांची रोकड असलेली बॅग चोरट्याने आरामबस मधून पळवल्याची घटना निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घटनेची शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०३-२०१६) :**(१) होय.
(२) सदर गुन्ह्यातील फिर्यादी हे लक्झरी बसमधून प्रवास करीत असताना त्यांचे मालकीचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम असलेली सॅक चोरीचे संदर्भात दिलेल्या फिर्यादीवरुन संगमेश्वर पोलीस ठाणे भाग १ ते ५, गुन्हा रजि.नं. ८३/२०१५, भा.दं.वि.कलम ३७९, ३४ अन्वये गुन्हा

दाखल करण्यात आला असून ६ आरोपींपैकी ५ आरोपींना अटक करण्यात आली आहे. गुन्हा पोलीस तपासावर प्रलंबित आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### उदगीर (जि.लातूर) येथे उपजिल्हा माहिती कार्यालय मंजूरी करणेबाबत

**(२७) ३०७८४ (२१-०१-२०१६). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उदगीर (जि.लातूर) येथे कर्नाटक व राज्य शासनाच्या विविध प्रादेशिक भाषांचे वृत्तपत्र कार्यालय व स्थानिक वृत्तपत्रांची संख्या लक्षात घेता उदगीर तालुक्यासह सिमा भागातील मराठी भाषीकांसाठी उपजिल्हा माहिती कार्यालय मंजूर करावे अशी मागणी लोकप्रतिनिधींनी माहे ऑक्टोबर,२०१५ मध्ये केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपजिल्हा माहिती कार्यालय मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०३-२०१६) :**(१) होय.
(२) व (३) उदगीर (जि.लातूर) येथे उपजिल्हा माहिती कार्यालय सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या दि. १२.२.२०१६ च्या पत्रान्वये शासनास प्राप्त झाला असून त्याची छाननी करण्यात येत आहे.

---

### अभ्युदयनगर काळाचौकी मुंबई येथील म्हाडाच्या वसाहतीमधील इमारतींच्या पुनर्विकासाबाबत

**(२८) ३०७९१ (२१-०१-२०१६). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अभ्युदयनगर काळाचौकी मुंबई- ३३ येथे असलेल्या म्हाडाच्या वसाहतीमधील इमारतींच्या पुनर्विकासाबाबत म्हाडाने पुनर्विकास आराखडा तयार करुन त्यास शासनाची मान्यता घेतली आहे काय, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुनर्विकास आराखडयाचे स्वरुप काय आहे व सदर पुनर्विकास हा क्लस्टर डेव्हलपमेंट नुसार करताना त्याचे स्वरुप काय राहणार आहे व सद्या असलेल्या रहिवाश्यांना किमान किती चटईक्षेत्र असलेली घरे देण्यात येणार आहेत तसेच सदर पुनर्विकास म्हाडा स्वत: करणार आहे की खाजगी विकासकांकडून निविदा मागवून करणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, खाजगी विकासकांच्या निविदांमध्ये कोणकोणत्या अटी व शर्तीचा समावेश करण्यात आला आहे व किती कालावधीत पुनर्विकासाचे काम पूर्ण करण्यात येणार आहे तसेच

सदर म्हाडाच्या वसाहतीचा पुनर्विकास स्वत: म्हाडा न करण्याची कारणे काय आहेत
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०४-०३-२०१६) :**(१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोराडी (जि.नागपूर) येथील तुकडोजी महाराजांच्या पुतळ्याची अज्ञात समाजकंटकानी विटबंना केल्याबाबत**

**(२९) ३१०१० (२१-०१-२०१६). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोराडी (जि.नागपूर) येथील प्रभाग क्र.१ मध्ये असलेल्या वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्याची दिनांक १६ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास अज्ञात समाजकंटकानी विटबंना केली असल्याची गंभीर घटना निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घटनेची सर्वत्र निंदा होत असून सर्वच स्तरातून निषेध व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीअंती कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०३-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) होय.
(३) सदर प्रकरणी गुन्ह्यातील अज्ञात आरोपींविरुध्द गुन्हा नोंद क्र.३१३७/१५ भा.दं.वि. कलम २९५ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून गुन्हा पोलीस तपासावर प्रलंबित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**निवृत्त पोलीसांना बीडीडी चाळीत घर मिळणेबाबत**

**(३०) ३११८२ (२१-०१-२०१६). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील वरळी बीडीडी चाळीतील घरामध्ये अवैध राहणाऱ्या भाडेकरुना मालकी हक्क देणारा अध्यादेश शासनाने दिनांक २५ ऑक्टोबर, १९६२ रोजी जारी केला, त्याची मुदत दिनांक

११ ऑक्टोबर, १९९४ पर्यंत वाढविण्यात आली. या तारखेपर्यंत या घरांमध्ये भाडेकरुंना मालकी हक्क देण्यात आले, परंतु काही भाडेकरुनी आम्ही सेवेतून निवृत्त झालो असल्यामुळे याचा लाभ आम्हालाही मिळावा, यासाठी पोलिस वसाहतीतील सेवानिवृत्त पोलिसांनी वारंवार शासनाकडे विनंती मागणी करुनही अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही झाली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०५-०३-२०१६) :**(१) व (२) शासनाने मुंबईतील बी.डी.डी. चाळीमध्ये दि.२१.०५.१९५९ पर्यंत वास्तव्य करीत असलेल्या अनधिकृत गाळेधारकांची भाडेदारी नियमित करण्याचा शासन निर्णय गृहनिर्माण विभागाने दि.२५.१०.१९९२ रोजी निर्गमित केला होता. शासनाच्या दि.११.१०.१९९४ च्या शासन निर्णयान्वये सदर भाडेदारी नियमित करण्याचा दि.२१.०५.१९५९ च्या ऐवजी दि.०१.०५.२१९९४ असा सुधारित करण्यात आला आहे. परंतु त्यांना त्या घरांचे मालकी हक्क देण्याबाबतचा कोणताही अध्यादेश काढलेला नाही. बी.डी.डी. चाळीतील काही सदनिका शासकीय विभागाना सेवा सदनिका म्हणून भाडेदारीने देण्यात आलेल्या आहेत, त्यामध्ये पोलीस आयुक्त, मुंबई यांना पालिसांच्या सेवा सदनिकांकरिता देण्यात आलेल्या २९१६ सदनिकांचा समावेश आहे. बी.डी.डी.चाळीतील पोलिस वसाहतीतील श्री.महादेव सखाराम मोरे यांनी सोनिवृत्तीनंतर सदरहू खोली त्यांच्या नावे मालकी हक्काने द्यावे याकरीता विनंती केली असता त्यांची विनंती अमान्य केल्यनंतर त्यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्र.८७६/२०११ दाखल केली असता मा.उच्च न्यायालयाने त्यांची याचिका दि.११.०९.२०१५ च्या आदेशान्वये खारिज केली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**म्हाडाने प्रत्येक घरासाठी गिरणी कामगारांकडून अधिक रक्कम घेतल्याबाबत**

**(३१) ३२१४२ (२१-०१-२०१६). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या जवाहरलाल नागरी पुनर्निमाण योजनेंतर्गत म्हाडाने गिरणी कामगारांसाठी माहे जून, २०१२ मध्ये काढलेल्या घरांच्या सोडतीवेळी या प्रकल्पाला केंद्रीय अनुदान मिळालेले असल्याने प्रत्येक घराच्या बांधकामाच्या २५ टक्के रक्कम गिरणी कामगाराला आकारणे गरजेचे असताना म्हाडाने प्रत्यक्षात प्रत्येक घरासाठी ७ लाख ५० हजार रक्कम आकारली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तसेच गिरणी कामगारांकडून घराचे मुद्रांक शुल्क १०० रुपये आकारणे गरजेचे असतान म्हाडाने ३७ हजार ५०० रुपये निश्चित केल्याने प्रत्येक गिरणी कामगारांकडून सुमारे ५ लाख २८ हजार रुपये अधिक घेतले असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१५ च्या तिस-या

आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी शासनाकडून करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, त्यात काय निष्पन्न झाले आहे आणि सदर सोडतीवेळी गिरणी कामगारांकडून घेतलेली अधिक रक्कम त्यांना परत अदा करण्याबाबत शासनाकडून आजतागायत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१०-०३-२०१६)** :(१) जवाहर नागरी पुनर्निर्माण योजनेअंतर्गत गिरणी कामगारांच्या प्रत्येक सदनिकासाठी आकारण्यात आलेल्या एकूण रक्कमेपैकी रु.२,९०,०००/- ही अनुदान वजा करुन प्रति सदनिका रु.७,५०,०००/- इतकी रक्कम आकारण्यात आली आहे.
(२) मुद्रांक शुल्काची आकारणी महाराष्ट्र शासनाने विर्निदेशीत केल्याप्रमाणे ५% आकारणी बंधनकारक आहे. त्यानुसार गिरणी कामगारांच्या सदनिकेची रु.७,५०,०००/- इतक्या रक्कमेवर ५% म्हणजे रु.३७,५००/- इतके मुद्रांक शुल्क आकारण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बुलढाणा जिल्हयातील मजुरांना स्थानिक ठिकाणी कामे उपलब्ध होण्याबाबत

**(३२) ३२६९७ (२१-०१-२०१६). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्ह्यातून दरवर्षी ऑक्टोबर ते एप्रिल दरम्यान मजूरांचे गुजरांतसह इतर राज्यांमध्ये मजूरीसाठी मोठ्या प्रमाणात स्थलांतर होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्ह्यातून लोणार, देऊळगांवराजा तालुक्यातून मजूर इतर राज्यांमध्ये जात असतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या मजूरांना स्थानिक ठिकाणीच काम उपलब्ध करण्यासंदर्भात शासनाने कोणती पावले उचलली आहेत वा उचलणार आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०८-०३-२०१६)** :(१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग मंत्रालय, मुंबई यांनी दिनांक १७ नोव्हेंबर, २००८ रोजी सर्व सुक्ष्म, लघु, मध्यम, मोठ्या व विशाल औद्योगिक उपक्रमांमध्ये किमान ८० टक्के स्थानिक उमेदवारांना नोकऱ्यांमध्ये प्राधान्याने घेण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी हे या समितीचे अध्यक्ष असून महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र हे सदस्य सचिव आहेत. सदरची समिती नियमितपणे

बैठका घेवून याबाबत आढावा घेत असते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड जिल्ह्यात गत १५ वर्षात ९७८ बेवारस मृतदेह सापडले असल्याबाबत**

**(३३) ३२८२३ (२१-०१-२०१६). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्ह्यात गत १५ वर्षात ९७८ बेवारस मृतदेह सापडलेले असून त्यातील फक्त २४ बेवारस मृतदेहाबाबत खुनाचे गुन्हे नोंदविण्यात आले असून उर्वरित ९५४ बेवारस मृतदेहांचा तपास लागू शकला नसल्याचे दिनांक १६ सप्टेंबर, २०१५ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त सर्व बेवारस मृतदेहाबाबत फक्त पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली असून कोणताही गुन्हा दाखल झाला नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणांचा तपास करणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०३-२०१६) :**(१) रायगड जिल्हा पोलीस कार्यक्षेत्रात गत १५ वर्षात एकूण ७३२ बेवारस मृतदेह सापडलेले आहेत.
(२) हे खरे नाही.
एकूण ७३२ बेवारस मृतदेहापैकी १९ मृतदेहासंदर्भात गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. त्यामध्ये १७ खून, १ मोटार अपघातामध्ये मयत, १ नवजात बालक असे गुन्हे आहेत.
(३) एकूण ७३२ बेवार मृतदेहांपैकी १९ मृतदेहासंदर्भात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ६९२ बेवारास मृतदेहाबाबत पोलीस ठाणत अकस्मात मृत्यूचे प्रकरण दाखल करुन त्याबाबत अनोळखी मृताची ओळख पटविण्याकरिता प्रसिध्दी तसेच योग्य तो तपास करुन त्याबाबतचा संक्षिप्त अहवाल उपविभागीय दंडाधिकारी यांचेकडे पाठविण्यात आलेला आहे. व उर्वरित २१ बेवारस मृतदेह पोलीस तपासावर प्रलंबित असून मृतदेहाची ओळख पटविण्याच्या दृष्टीने नातेवाईकांचा शोध घेण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई पोलिसांनी खरेदी केलेली बॉम्ब प्रतिबंधक वाहने नादुरुस्त असल्याबाबत**

**(३४) ३३२५६ (०५-०३-२०१६). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई पोलिसांनी सन २००८ मध्ये सुमारे ७ कोटी रुपयांची बॉम्ब प्रतिबंधक वाहने खरेदी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वाहनांची देखरेख दुरुस्ती करण्याचा करार सन २०१० पासून संपल्याने उक्त वाहनांची दुरुस्ती झाली नसून, दुरुस्ती करण्यासाठी १ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वाहनांची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०३-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) सदर बॉम्ब प्रतिबंधक वाहनांची उत्पादक कंपनी मे. अमेरिकन सायन्स ॲन्ड इंजिनिअरींग या कंपनीने मोबाईल व्हेईकल स्कॅनर मशीनच्या देखभालीसाठी सादर केलेला प्रस्ताव प्रचंड खर्चिक असून, सदर मशीन सध्या नादुरुस्त असल्याने त्याच्या दुरुस्तीसाठी वेगळा अतिरिक्त खर्च येणार आहे. तसेच, सदर प्रस्तावाच्या अटी गुंतागुंतीच्या व जाचक असून उपकरणांच्या देखभालीचा प्रस्ताव व्यवहार्थ नसल्याने सदर वाहन निर्लेखित करण्याचे ठरविण्यात आले आहे. तरीसुध्दा सदर वाहनांची आवश्यकता भासल्यास नवीन अद्यावत उपकरण खरेदी करण्यात येईल.

---

**राज्यातील सर्व जिल्हयात सेवा हमी योजना ऑनलाईन कार्यान्वीत करण्याबाबत**

**(३५) ३३३४२ (२१-०१-२०१६). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने सेवा हमी कायद्याव्दारे ४६ प्रकारचे जन्म-मृत्यू, ज्येष्ठ नागरी, वय, राष्ट्रीयत्व, अधिवास, शेतकरी असल्याचा दाखला, भूमिहीन प्रमाणपत्र, विवाह नोंदणी, रहिवास प्रमाणपत्र, हयातीचा दाखला, ग्राम पंचायतीकडून येणारे दाखले, विधवा दाखला, मुद्रांक नोंदणी आदी ४६ सेवा ऑनलाईन उपलब्ध करून देण्याचे उद्घाटन मा.मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहात करण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ च्या सुमारास उजेडात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील सर्व जिल्हयात सेवा हमी योजना ऑनलाईन कार्यान्वीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०३-२०१६) :**(१) होय.

(२) दिनांक २ ऑक्टोबर, २०१५ पासून राज्यातील सर्व जिल्हयांत व तालुक्यांत आपले सरकार या एकाच पोर्टलद्वारे विविध विभागांच्या एकूण ४६ सेवा ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. तसेच ऑनलाईन सेवांच्या संख्येत वाढ होऊन दिनांक २६ जानेवारी २०१६ पासून १५६ सेवा ऑनलाईन पध्दतीने नागरिकाना उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्भ्वत नाही.

---

**जालना तालुक्यातील (जि.जालना) मौजे इंदेवाडी येथे मंजूर करण्यात आलेले ई सेवा केंद्र तेथे सुरू न करता जालना शहरातील अंबड चौफुली येथे सुरु करण्यात आल्याबाबत**

**(३६) ३३५८३ (२१-०१-२०१६). श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना तालुक्यातील (जि.जालना) मौजे इंदेवाडी येथे मंजूर करण्यात आलेले ई सेवा केंद्र तेथे सुरू न करता सदर केंद्र जालना शहरातील अंबड चौफुली येथे सुरु करण्यात आल्यासंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयाकडे माहे जुलै, २०१५ च्या सुमारास तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रार करूनही या प्रकरणी कोणतीच कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०३-२०१६) :**(१) होय.

जिल्हाधिकारी जालना यांच्याकडे सरपंच, ग्रामपंचायत इंदेवाडी, ता.जालना यांचे दि. ०५.०६.२०१५ चे पत्र प्राप्त झाले आहे.

(२) या संदर्भात व्यवस्थापक, सी.एम.एस. जालना व तहसिलदार, जालना यांच्याकडून जिल्हाधिकारी, जालना यांना प्राप्त झालेल्या अनुक्रमे दिनांक ११.२.१६ व २५.१.१६ च्या अहवालानुसार मौजे इंदेवाडी हा ग्रामीण भाग असून तेथे विद्युतपुरवठा व इंदरनेट सुविधा सुरळितपणे सुरु नाहीत. सदर सुविधा सुरळीत झाल्यानंतर अंबड चौफुली येथून इंदेवाडी येथे ई-सेवा केंद्र स्थलांतर करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी, जालना यांनी व्यवस्थापक, सी.एम.एस. जालना यांना दिले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई उपनगरातील गोरेगांव (पूर्व) दिंडोशी येथील न्यु म्हाडाच्या २८ गृहनिर्माण संस्थांना ३.५ चटई क्षेत्र मंजुर करण्याबाबत**

**(३७) ३३६३४ (२१-०१-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील गोरेगांव (पूर्व) दिंडोशी येथील नागरी निवारा परिषद वसाहतीप्रमाणे येथील न्यु म्हाडाच्या २८ गृहनिर्माण संस्थांना विकास प्रकल्प राबविण्यास सोसीस्कर व्हावे यासाठी ३, ५ चटई क्षेत्र मंजुर करण्यात यावे यासंदर्भात मा. मुख्यमंत्री महोदयांना लोकप्रतीनिधींनी दिनांक १० एप्रिल, २०१५ रोजी लेखी निवेदन दिले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने न्यु म्हाडा वसाहतींना ३.५ चटई क्षेत्र मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. प्रकाश महेता (०५-०३-२०१६)** :(१) हे खरे आहे.

(२) याबाबतची कार्यवाही नगर विकास विभागाकडून करण्यात येते. त्यामुळे सदर निवेदन या विभागाच्या दि.०४.०९.२०१५ रोजीच्या पत्रान्वये नगर विकास विभागास उचित कार्यवाहीसाठी पाठविण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे जिल्ह्यातील रांजणगाव एमआयडीसीमधील दि बॉम्बे डाईंग ॲण्ड म्यॅन्युफॅक्चरींग कंपनी लि.मधील कर्मचाऱ्यांना कामावर घेण्याबाबत

**(३८) ३३९३५ (२१-०१-२०१६). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील रांजणगाव एमआयडीसीमधील दि बॉम्बे ॲण्ड मॅन्युफॅक्चरींग कंपनी लि. मधील कर्मचाऱ्यांना अचानक राजीनामा देण्याच्या सुचना कंपनी प्रशासनाने दिनांक १० सप्टेंबर, २०१५ रोजी दिल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास दोन दिवसात राजीनामा न दिल्यास कामावरून काढून टाकण्याची धमकी कंपनी प्रशासनाने कर्मचाऱ्यांना दिली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कर्मचाऱ्यांची देणी लिखीत स्वरूपात देण्याची मागणीही कंपनी प्रशासनाने फेटाळुन लावली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास दि बॉम्बे डाईंग ॲण्ड मॅन्युफॅक्चरींग कंपनी लि. या कंपनी मधील कर्मचाऱ्यांना कामावर घेण्याबाबत शासनाने कय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. प्रकाश महेता (११-०३-२०१६)** :(१) बाजारातील मंदीमुळे मालास उठाव नसल्याने जून २०१५ पासून कारखान्यातील उत्पादन प्रक्रिया बंद आहे. त्यामुळे व्यवस्थापनाच्या व्यवस्थापकीय कर्मचारी (Managing Staff) यांच्या रोजागाराच्या अटी व शर्तीनुसार त्यांनी राजीनामे द्यावे असे, व्यवस्थापनाने व्यवस्थापकीय कर्मचाऱ्यांना सांगितले, हे खरे आहे.

(२) दि. ८ सप्टेंबर, २०१५ ते १५ डिसेंबर, २०१५ या कालावधीत ४५ व्यवस्थापकीय कर्मचाऱ्यांनी त्यांच्या नोकरीचा राजीनामा दिला. राजीनामा दिलेल्या सर्व कर्मचाऱ्यांना व्यवस्थापनाने त्यांचे कायदेशिर देणी अदा केलेली आहेत. सध्या कारखान्यामध्ये १६० कामगार व ९ व्यवस्थापकीय कर्मचारी कामावर आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कार्सोडे (जि.सिंधुदुग) येथील मायनिंग परिसरात भुसूरुंग स्फोट व नदीनाल्यात दुषित गढूळ पाणी सोडत असल्यामुळे ग्रामस्थाने आंदोलन केल्याबाबत**

**(३९) ३४६०८ (२१-०१-२०१६). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कार्सोडे (जि.सिंधुदुग) येथील मायनिंग परिसरात भुसूरुंग स्फोट व नदीनाल्यात दुषित गढूळ पाणी सोडत असल्यामुळे परिसरातील ग्रामस्थांनी त्रस्त झाल्यामुळे खाणींवर चाल करुन स्फोटासाठी छिद्रे मारणा-या ब्लास्टिंग ऑपरेटला मारहाण केल्याची घटना घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त ठिकाणी सुरु असलेल्या उत्खन्ननाबाबत तसेच भुसुरुंगाबाबत शासनाने चौकशी करुन दोषींवर काय कारवाई कली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०५-०३-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) कासार्डे, जि.सिंधुदुर्ग येथे सुरु असलेल्या खनिज उत्खननासंदर्भात श्री.संजय पाताडे यांनी दिनांक २८.०४.२०१५ च्या पत्रान्वये तक्रार केली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने उपसंचालक, प्रादेशिक कार्यालय, भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, कोल्हापूर यांच्या चमुने दिनांक १२.०६.२०१५ रोजी सदर खनिपट्टा क्षेत्राचे स्थळ निरिक्षण करुन अहवाल सादर केला आहे. खाणपट्टयाच्या ठिकाणी कोणंत्याही प्रकारचे ब्लास्टींग साहित्य अथवा ब्लास्टींग साधने आढळून आलेली नाहीत. तसेच नदीक्षेत्राची पाहणी केली असता खाणपट्टया पासून नदीपात्र सुमारे ५ कि.मी. अंतरावर असून नदीचे पाणी स्वच्छ असल्याचे आढळून आले असल्याचे सदर अहवालात नमुद केले आहे. त्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील सुरक्षेच्या दृष्टीने दुर्लक्ष करणाऱ्या मॉलवर कारवाई करण्याबाबत**

**(४०) ३४८७१ (२१-०१-२०१६). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मॉल व्यवस्थापनास दहशतवादी हल्ला, महिलांविरोधी गुन्हे ,इ.बाबत सतर्क रहाण्याच्या सूचना वेळोवेळी पोलिसांनी देऊनही मॉल व्यवस्थापन सुरक्षेबाबत दुर्लक्ष करीत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुरक्षेच्या दृष्टीने दुर्लक्ष करणाऱ्या कुर्ला येथील फिनीक्स व घाटकोपर येथील सिटी या दोन मॉल विरोधात पोलिसांनी गुन्हे नोंदविले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मॉलवर तसेच सुरक्षेच्या संदर्भात अक्षम्य दुर्लक्ष करणाऱ्या इतर मॉलवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४)  नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०३-२०१६) :**(१) मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या कार्क्षेत्रात सर्व मॉल्सना दहशतवादी हल्ला व महिलांविरोधी गुन्ह्यांबाबत सुरक्षेच्या दृष्टीने करावयाच्या उपाययोजनांबाबत वेळोवेळी सूचना निर्गमित करण्यात येतात. अशा सूचनांवर दुर्लक्ष करणाऱ्या मॉल्सवर योग्य ती कारवाई करण्यात येते.
(२) हो, हे खरे आहे.
फिनीक्स मॉल वर घाटकोपर पोलीस ठाणे येथे व सिटी मॉलवर पार्क साईट पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.
(३) बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालायच्या अधिपत्याखालील सुरक्षा शाखा, मुंबई यांचे मार्फतीने त्यांचे अभिलेखाखालील मॉल्सचे नियमितपणे सुरक्षा आढावे घेण्यात येतात. अशा आढाव्या दरम्यान काढलेल्या सुरक्षा त्रूटींविषयी संबंधित मॉल्सना योग्य ती पूर्तता करुन घेणेबाबत कळविण्यात येते. तसेच वेळोवेळी डीकॉय आयोजनाचे काम सुरक्षा शाखेमार्फत केले जाते. असे डिकॉय यशस्वी झाल्यास संबंधित मॉलचे सुरक्षा अधिकारी व व्यवस्थापक यांना त्यांचे मॉलची सुरक्षा व्यवस्था कार्यक्षम करणेबाबत सूचना देण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राऊळगाव (ता.कळमेशवर जि.नागपूर) जवळील नविरा शिवारातील अमिन एक्सप्लोझिव या कंपनीकडून कामगारांचा छळ होत असल्याबाबत**

**(४१) ३६१४२ (२१-०१-२०१६). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राऊळगाव (ता.कळमेश्वर, जि.नागपूर) जवळील नविरा शिवारातील स्फोटकांचा कारखाना असलेल्या अमिन एक्सप्लोझिव प्रा. लि.कंपनीच्या  व्यवस्थापनाकडून कामगारांचा छळ होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कामगारांना जिवानिशी ठार मारण्याच्या धमक्याही व्यवस्थापनाकडून दिल्या जात असल्याच्या आरोपावरुन कामगारांनी कंपनी व्यवस्थानाविरुध्द कंपनीचे व्यवस्थापक अभिषक जयस्वाल यांची तक्रार पोलीस ठाण्यात केली आहे, हे खरे आहे काय,
(३) तसेच बाहेर राज्यातून आणलेल्या अकुशल, अज्ञानी कामगारांकडून व्यवस्थापन काम करुन घेत असून स्थानीय कामगारांना कामापासून डावलण्यात येत असल्याने कामगारांनी वारंवार पोलीस ठाण्यामध्ये तक्रारी केल्या असून कळमेश्वर पोलीसांनी याकडे दुर्लक्ष केले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी  शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत  ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०३-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) सदर प्रकरणी कंपनी कामगार रंजित कुमारे महेंद्र प्रसाद सिंह यांनी चार्टर्ड अकाऊंटन्ट श्री.अभिषेक जयस्वाल तसेच कंपनी मॅनेजर श्री.पी.के. पाल यांचे विरुध्द पोलीस ठाणे कळमेश्वर येथे तक्रार दाखल केली होती.

(३) हे खरे नाही.

याबाबत कामगारांची तक्रार प्राप्त नाही.

(४) याप्रकरणी चार्टर्ड अकाऊंटन्ट श्री.अभिषेक जयस्वाल तसेच कंपनी मॅनेजर श्री.पी.के.पाल यांना सी.आर.पी.सी. कलम १४९ अन्वये नोटीस देण्यात आली आहे. कामगार आणि कंपनी व्यवस्थापन यांच्यात सकारात्मक चर्चा होऊन दिनांक १०.१०.२०१५ पासून कंपनी सुरळीत सुरु ठेवण्याची हमी दिल्याने सर्व कामगार कामावर रुजू होऊन कंपनीचे काम सुरळीत सुरु झाले आहे. तेव्हापासून कोणत्याही तक्रारी पोलीस ठाणेत प्राप्त नाहीत. सदर कंपनीमध्ये जास्तीत जास्त स्थानिक कामगारांना प्राधान्य देण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहरातील झोपडपट्टीचा पुर्नविकास पारदर्शकरित्या करण्याबाबत**

**(४२) ३६२९६ (२१-०१-२०१६). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील झोपडपट्टीचा पुर्नविकास पारदर्शकरित्या करण्याचा निर्णय शासनाने माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१०-०३-२०१६) :**(१) होय.

(२) मा.मंत्री (गृहनिर्माण) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०१.०७.२०१५ रोजी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र या कार्यालयाच्या कामकाजाबाबत घेण्यात आलेल्या बैठकीमध्ये पुणे महानगरपालिका व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रामध्ये सरकारी/निमसरकारी व खाजगी जमिनींवरील झोपडपट्ट्यांचे सर्वेक्षण विकासकामार्फत न करता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र कार्यालयाने करावे, अशा सुचना देण्यात आल्या होत्या. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र कार्यालयाने त्यांच्या क्षेत्रातील झोपडपट्ट्यांच्या सर्वेक्षणाची कार्यवाही यापूर्वीच सुरु केली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजा-मालगुडा (ता.जिवती, जि.चंद्रपुर) येथील श्रीमती. शानुबाई प्रभु राठोड व त्यांचे पुतणे श्री.रामा मारोती आडे यांना पोलीस ठाणेदार व शिपाई यांनी मारहाण केल्याबाबत**

**(४३) ३६६५५ (२१-०१-२०१६). ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा-मालगुडा (ता. जिवती, जि. चंद्रपुर) येथील श्रीमती. शानुबाई प्रभु राठोड व त्यांचा पुतण्या रामा मारोती आडे यांना दिनांक ३ ऑक्टोंबर, २०१५ रोजी तत्कालीन पोलीस ठाणेदार व त्यांचे सहकारी शिपाई यांनी अमानुष मारहाण केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, श्रीमती. शानुबाई प्रभू राठोड व त्यांचे पुतणे ह्यांच्या गुप्तअंगावर व पार्श्वभागी बेदम मारहाण करण्यात आल्यामुळे ते गंभीर जखमी झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मारहाण ही कारण नसतांना करण्यात आली असून संबंधित दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासनामार्फत कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०३-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) हे ही खरे नाही.
(३) दि.०३/१०/२०१५ रोजी मौजा नानकपठार (जि.चंद्रपूर) गावाशेजारी नाल्याजवळ आरोपी श्रीमती शानुबाई प्रभू राठोड ही अवैधरित्या हातभट्टीवर मोहाची दारु काढताना आढळून आल्याने जिवती पोलीस स्टेशनच्या कर्मचा-यांनी अटक केली असून अप.क्र.६०४७/१५, मुं.दा.का. कलम ६५(फ) प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपी महिलेस जे.एम.एफ.सी. कोर्ट, राजुरा येथे हजर केले असता न्यायालयाने “आरोपी महिलेस अटक करुन हजर केले. आरोपीला पोलीसांकडून मारहाणीची किंवा त्रासाची कोणतीही तक्रार नाही” असे आदेश दिले आहेत. आरोपीस दि.१६/१०/२०१५ पर्यंत न्यायालयीन कोठडी देण्यात आली नंतर जामीनवर मुक्त करण्यात आले आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी, गडचांदूर यांनी चौकशी केली असता श्रीमती शानुबाई प्रभू राठोड यांनी केलेली तक्रार खोटी असल्याचे निदर्शनास आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील मौजे कोले कल्याण येथील मे.लाईफ हौसिंग डेव्हलपमेंट ॲड प्रोजेक्ट या विकासकाने भोगवटा प्रमाणपत्र नसतानाही रहिवाशांना स्थलांतरीत करुन झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविल्याबाबत**

**(४४) ३६७०८ (२१-०१-२०१६). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मे.लाईफ हौसिंग डेव्हलपमेंट ॲड प्रोजेक्ट या विकासकामार्फत नियोजित सौपर्णिका सह.गृहनिर्माण संस्था ए.डी. चाळ कलीना, कोलीवरी व्हीलेज, सांताक्रुझ (पू) मुंबई ९८ या जागेवर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विकासकाने भाडेकरुनां भूखंडा जवळील एका इमारतीत राहण्याची व्यवस्था केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बाब - २ नुसार इमारती भोगवटा प्रमाणपत्र मिळालेले नाही, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, बाब १, २ व ३ नुसार चौकशी करण्यात आली आहे काय,
(५) असल्यास, भोगवटा प्रमाणपत्र व पालिकाची परवानगी नसतानाही इमारतीत भाडेकरुनां रहावयास देणाऱ्या विकासक व पालिका अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०५-०३-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली १९९१ विनियम ३३(१०) परिशिष्ट-IV च्या कलम ४.१ मधील तरतुदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या ठिकाणी तात्पुरते बहूमजली संक्रमण शिबीर बांधणे अनुज्ञेय आहे. व विनियम ६५(ix) अन्वये ६ महिन्याच्या कालावधीसाठी एकूण ३ वर्षाकरिता तात्पुरत्या स्वरुपात संक्रमण शिबीर बांधण्यास परवानगी दिली जाते. त्यास अनुसरुन सदरहू झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील पात्र झोपडीधारकांसाठी तळमजला+४ मजले अशा स्वरुपातील तात्पुरते संक्रमण शिबीर बांधून विकासकाने ४० झोपडीधारकांची राहण्याची व्यवस्था केली आहे.
(३) बृहनमुंबई विकास नियंत्रण नियमावलीनुसार तात्पुरत्या संक्रमण शिबीरास भोगवटा प्रमाणपत्र देण्याची गरज नाही.
(४), (५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक येथील गंगापूर धरण परिसरात सुरक्षा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(४५) ३६८७८ (२१-०१-२०१६). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथील गंगापूर धरण परिसर तसेच धरणाचे बॅक वॉटर, सोमेश्वर धबधबा आदी परिसरात पावसाळा सुरु होताच सहलीला जाणाऱ्या तरुणांची संख्या वाढीस लागली आहे त्यामुळे या ठिकाणी मोठ्या प्रमाणात अपघातात वाढ झाली असून गैरप्रकारातही वाढ झाली तरीही सुरक्षिततेच्या दृष्टीकोणातून मात्र या ठिकाणी पुरेशी यंत्रणा कार्यान्वित नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या ठिकाणी पुरेशी सुरक्षा उपलब्ध करुन देण्यासाठी शासनामार्फत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०३-२०१६)** :(१) गंगापूर धरण परिसरात मोठ्या संख्येने तरुण येत असतात. काही तरुण अतिउत्साहाचे भरात बॅक वाटॅरपर्यंत जाण्याचा प्रयत्न करतात. त्यासाठी धरण परिसरात प्रवेश निषिध्द क्षेत्र असे फलक लावून उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींवर कायदेशिर कारवाई केली जाईल असा इशारा देण्यात आलेला आहे. तेथे अपघाताचे प्रमाणात वाढ झलेली नसून सदर ठिकाणी गैरप्रकार घडलेबाबत गुन्हे दाखल नाहीत.

सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून या ठिकाणी पाटबंधारे विभाग व पोलीस विभागामार्फत पुरेशी यंत्रणा कार्यान्वित आहे.

(२) गंगापूर धरण परिसर व बॅक वॉटरचे सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून पाटबंधारे विभागाकडून महत्त्वाचे ठिकाणी चौकीदार नेमलेले आहेत. तसेच काही ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आलेले आहेत. नाशिक तालुका पोलीस ठाणेकडून नियमितपणे गस्त करण्यात येते. ग्रामस्थांशी संवाद साधुन पोलीस मित्र तयार केलेले आहेत. ग्रामपंचायतीचे माध्यमातून बॅक वॉटरच्या दिशेने जाणाऱ्या रोडवर फाटक बसविण्यात आलेले आहेत. कोणताही गैरप्रकार घडू नये म्हणून यासाठी विशेष दक्षता घेतली जाते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**यवतमाळ जिल्हयातील वणी येथील श्री. वामन केशव निमकर यांचा खून करण्यात आल्याबाबत**

**(४६) ३७००९ (१२-०१-२०१६). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील वणी येथील मसकऱ्या गणपतीच्या महाप्रसादाच्या कार्यक्रमात जेवायला आलेल्या श्री.वामन केशव निमकर यांचा दिनांक ९ सप्टेंबर, २०१५ रोजी पुरुषोत्तम वंजारी व त्याच्या सहकार्याने खून केल्याची घटना उघडकीस आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबधीत दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०३-२०१६)** :(१) हे खरे नाही.

तथापि, श्री. पुरुषोत्तम देवराव वंजारी यांचे पत्नीने श्री. वामन केशव निमकर व त्यांचे मुलाला पंगतीतून उठविल्यासंदर्भात श्री. वामन निमकर व पुरुषोत्तम वंजारी यांच्यात वाद झाल्याने रागाच्या भरात पुरषोत्तम वंजारी याने स्टीलच्या धारदार पट्टीने श्री. वामन निमकर यांना जखमी केल्याची घटना घडली.

(२) सदर प्रकरणी पोलीस स्टेशन, वणी येथे गुन्हा र.जि.क्र. २६०/१५ भा.दं.वि. कलम ३२६,५०४,५०६ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून आरोपीस अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अमरावती मध्यवर्ती कारागृहा लगत असलेल्या राज्य महामार्गावरुन काही पार्सल कारागृहात फेकल्याबाबत

**(४७) ३७०८३ (२१-०१-२०१६). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती मध्यवर्ती कारागृहा लगत असलेल्या राज्य महामार्गावरुन काही पार्सल कारागृहात फेकल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान कारागृह प्रशासनाच्या निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे कारागृहाच्या सुरक्षेला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०३-२०१६) :**(१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे आणि पिंपरी-चिंचवड झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणात सुमारे ६० टक्के पदे रिक्त असल्याबाबत

**(४८) ३८१७८ (२१-०१-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे आणि पिंपरी-चिंचवड झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणात सुमारे ६० टक्के पदे रिक्त असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदरची पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०४-०३-२०१६) :**(१) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र कार्यालयासाठी एकूण ९८ पदांचा आकृतीबंध मंजूर असून सदर पदे प्रतिनियुक्ती/कंत्राटी पध्दतीने भरण्यात येतात. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार माहे सप्टेंबर, २०१५ अखेर सदर कार्यालयात एकूण ५१ प्रतिनियुक्ती/कंत्राटी पध्दतीवरील अधिकारी/कर्मचारी कार्यरत होते.

(२) व (३) महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ च्या कलम ३-I नुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र हे प्राधिकरणाकडील आस्थापनेच्या संदर्भात सक्षम आहे. त्यानुसर प्राधिकरणाच्या कार्यालयात आवश्यक अधिकारी/कर्मचा-यांची पदे प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्याकरिता

संबंधित विभागाकडे प्राधिकरणाकडून मागणी करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिर्डी येथील साई संस्थानाची देणी देण्याबाबत तसेच संस्थानचे प्रस्ताव निकाली काढण्याबाबत**

**(४९) ३८९५६ (२१-०१-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिर्डी येथील साई संस्थानाने गेल्या १४ वर्षात २५० कोटीचा निधी पुरग्रस्तांना मदत, दुष्काळग्रस्तांना मदत, त्सुनामी, भूकंप, मुख्यमंत्री, पंतप्रधान निधी, शाळा-कॉलेजला मदत, इत्यादी विविध समाज उपयोगिकांसाठी खर्च केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या जीवनदायी योजनेअंतर्गत गत दोन वर्षात ३८ कोटी रुपयांची देणी शासनाकडे तसेच १०० कोटीहून अधिक रक्कम रुग्णांच्या उपचारावर खर्च केलेली असतानाही शासनाने ती साई संस्थानला दिली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, साई संस्थान राज्यातील सामाजिक कामाविषयी इतके जागृत असताना साई संस्थानाचे डझनवारी प्रस्ताव शासनाच्या मंजूरीसाठी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, साई संस्थानाची देणी देण्याच्या दृष्टीने तसेच संस्थानचे प्रस्ताव निकाली काढण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०३-२०१६) :**(१) होय.
(२) रु ३८ कोटी रकमेपैकी रु ७,८१,१८,२९२/- इतकी रक्कम संस्थानला अदा करण्यात आली आहे.
(३) प्रस्ताव विचाराधीन आहेत.
(४) प्रलंबित रक्कमेबाबत सार्वजनिक आरोग्य विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे आणि संस्थानचे प्रस्ताव निकाली काढण्याच्या दृष्टीने कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विक्रोळी पूर्व (मुंबई) येथील कन्नमवार नगर २ येथील संक्रमण शिबिरातील रहिवाशांना नवीन इमारतीमध्ये स्थलांतर करण्याबाबत**

**(५०) ३९४१३ (२१-०१-२०१६). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विक्रोळी पूर्व (मुंबई) येथील कन्नमवार नगर २ येथील म्हाडाने अतिधोकादायक म्हणून घोषित केलेल्या संक्रमण शिबिरातील रहिवाशांना नवीन इमारतीमध्ये स्थलांतर करण्याची

प्रक्रिया सुरु झाली असुन नवीन इमारतींमध्ये मोक्याचे घर मिळवून देण्यासाठी दलालांचा सुळसुळाट वाढला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवीन इमारतींमध्ये रहिवाशांना स्थलांतरीत करण्यासाठी म्हाडाने लॉटरी काढणे अपेक्षित होते लॉटरीमुळे गाळेवाटपाची प्रक्रिया पारदर्शन बनली असती परंतू म्हाडाने लॉटरी न काढल्याने दलालांचा प्रभाव वाढल्याने त्याचा नाहक त्रास या इमारतीतील रहिवाश्यांना होत आहे हे पाहता शासन त्वरीत आवश्यक कोणती कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०८-०३-२०१६) :** (१) हे खरे नाही.

विक्रोळी पूर्व येथील कन्नमवार नगर-२ येथील संक्रमण शिबीरातील पात्र भाडेकरुन/रहिवाशी यांना नवीन इमारतींमध्ये स्थलांतर करण्याची प्रक्रीया चालू आहे. सद्यस्थितीत तेथील ४ इमारतींमध्ये १२८ गाळे असून १२८ पैकी ५९ पात्र भाडेकरू/रहिवाशी असून त्यांना नवीन इमारतीत स्थलांतरकरण्यात आले आहे.

(२) संक्रमण शिबीरातील रहिवाश्यांना दुसऱ्या संक्रमण शिबीरात सोडत प्रक्रियेद्वारे स्थलांतरण देण्याचे कोणतेही धोरण नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**

**मुंबई.** **प्रधान सचिव,**

**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.